पुढारी

# कौशल्य विकास केंद्र उभारणीसाठी महाविद्यालयांचे योगदान महत्त्वाचे

## कुलगुरू डॉ. शिर्के; सीमाभागातील प्राचार्यांची संयुक्त बैठक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू होत असलेल्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या गुणवत्तापूर्ण यशस्वीतेसाठी या भागातील महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन योगदान द्यावे. जेणेकरून या भागातील प्रत्येक विद्यार्थी कौशाल्याधिष्ठित होऊन रोजगारक्षम बनेल, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातर्फे सीमा भागातील विद्यार्थ्यांसाठी सुरू होत असलेल्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या प्रवेश प्रक्रियेच्या संदर्भात र. भा. माडखोलकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय चंदगड येथे सीमाभागातील महाविद्यालयांचे प्राचार्य, अग्रणी महाविद्यालय योजनेचे समन्वयक, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक यांच्या संयुक्त बैठकीत ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आज स्पर्धात्मक जीवनामध्ये कौशल्य विकासाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले असून या भागातील विद्यार्थी कौशल्य प्रशिक्षणाने स्वयंपूर्ण व्हावे, यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांची माहिती समाजापर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे.

कुलसचिव विलास नांदवडेकर, विद्यापीठाच्या उपक्रमास सर्व महाविद्यालयांनी सहकार्य करावे, सामूहिक जबाबदारी म्हणून सर्वांनी या भागाच्या विकासासाठी मदत करावी. प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी सादरीकरण करून उपक्रमाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी शिवराज कॉलेजचे प्राचार्य डॉ. कदम, नेसरी महाविद्यालांचे प्राचार्य डॉ. भांबर, साधना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. अनिता पोवार यांनी मनोगत व्यक्त केले. स्वागत प्राचार्य डॉ. पी. आर. पाटील यांनी केले. प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी प्रास्ताविक केले. महेश चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे अतुल एतावडेकर, आर. एम. जाधव उपस्थित होते.

लोकमत

# ताराराणी वसतिगृहाचे आज उद्‌घाटन

कोल्हापूर : येथील ताराराणी विद्यापीठाने उभारलेल्या विद्यार्थिनी वसतिगृहाच्या नवीन इमारतीचे उद्‌घाटन आज, गुरुवारी सकाळी अकरा वाजता शाहू छत्रपती यांच्या अध्यक्षतेखाली माजी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. ऑलिम्पिक २०२१ मध्ये विविध क्रीडा प्रकारांत देशाचे प्रतिनिधित्व केलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील खेळाडूंचा सत्कार डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवनात शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.डी.टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ.क्रांतीकुमार पाटील यांनी दिली.

# कुलगुरू डॉ.डी.टी.शिर्के यांची अध्यक्षपदी निवड

कोल्हापूर, ता. ८(प्रतिनिधी)-

..................................

शिवाजी विद्यापीठ नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ यांच्या अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या 'शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अँण्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन' कंपनी (सेक्शन-८)च्या अध्यक्षपदी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांची निवड करण्यात आली आहे.

कंपनीच्या संचालक मंडळाची पहिली बैठक विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली. सदर बैठकीमध्ये कुलगुरू डॉ.शिर्के यांची अध्यक्षपदी एकमताने निवड करण्यात आली.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व ग्रंथभेट देऊन नूतन अध्यक्षांचे अभिनंदन व स्वागत करण्यात आले. या बैठकीस कुलसचिव डॉ.विलास नांदवडेकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.एम.एस. देशमुख आदी उपस्थित होते.

महासत्ता एकच आवृत्ती

14 OCT 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या नियोजित सातारा उपकेंद्रासाठी सर्वोतोपरी सहकार्य: खास. उदयनराजे भोसले

**कोल्हापूर, ता.११ (प्रतिनिधी)**

शिवाजी विद्यापीठाच्या सातारा येथील नियोजित उपकेंद्रासाठी सर्वोतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी सोमवारी दिली. आज मंगळवार ता. १२ ऑक्टोबर रोजी सातारा जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन उपकेंद्राच्या जागेसाठीचा प्रश्न मार्गी लावण्याचा आपला प्रयत्न राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

शिवाजी विद्यापीठात सोमवारी सायंकाळी खासदार भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक पार पडली. त्यावेळी ते बोलत होते.

खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, केवळ आर्थिक आणि भौगोलिक कारणांनी कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याची आपली जबाबदारी आहे. या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अडचणी सोडवून त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामील करवून घेण्याच्या दृष्टीने स्थानिक पातळीवर विद्यापीठाचे उपकेंद्र अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के अध्यक्षीय भाषणात म्हणाले, शिवाजी विद्यापीठाची उपकेंद्रे अगर उपपरिसर निर्माण करीत असताना त्या ठिकाणी आम्हाला केवळ 'आणखी एक महाविद्यालय अगर विद्यापीठाचे विस्तारित स्वरुप' अभिप्रेत नसून स्थानिक संसाधने, तेथील भौगोलिक वैशिष्ट्ये या सर्वांचा समावेश करून त्यांची नव्या शैक्षणिक धोरणाशी सांगड घालून विद्यार्थ्यांना स्थानिक वैशिष्ट्यांची रोजगाराभिमुखता प्रदान करून संपन्न व समृद्ध बनविणारे अभ्यासक्रम अपेक्षित आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले, तर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी अधिसभा सदस्य डी. जी. बनकर, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, उपकुलसचिव वैभव ढेरे उपस्थित होते.

महासत्ता एकच आवृत्ती 14 OCT 2021
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र प्रवेशासाठी अर्ज पाठवावेत

कोल्हापूर,ता११(प्रतिनिधी)–

पदवीप्राप्त आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकडून शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात प्रवेशासाठी परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

पदवीप्राप्त आणि पदव्युत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी यु.जी.सी, नवी दिल्ली योजनेअंतर्गत एस.सी,एस.टी, ओबीसी, ई.डब्ल्यू.एस (नॉनक्रिमिलेयर) व अल्पसंख्यांक (मुस्लिम ख्रिश्चन, शीख, बौध्द आणि जैन) आणि खुल्या गटातील विद्यार्थ्यांकरिता शिवाजी विद्यापीठ स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रात सन २०२१–२०२२ शैक्षणिक वर्षासाठी प्रवेश परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर अर्ज शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www. unishivaji.ac.in) युजीसी सेंटर फॉर कोचिंग फॉर कॉम्पेटिटिव्ह एक्झामिनेशन्स वर आणि केंद्रांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.दि.२० ऑक्टोबर २०२१ पर्यत प्रवेश अर्ज आवश्यक कागदपत्रासहित केंद्राच्या ईमेल आयडीवर पाठवून द्यावेत. तसेच केंद्रांच्या कार्यालयात जमा करावेत. प्रवेश परीक्षा ही दि– २७ ऑक्टोबर रोजी दु. १२.०० ते २.०० या वेळेत ऑफलाईन पध्दतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मानव्यशास्त्र इमारत, शिवाजी विद्यापीठात घेण्यात येईल याची नोंद घ्यावी,असे समन्वयक प्रा.डॉ. पी.एस.कांबळे यांनी कळविले आहे.

राष्ट्रीय विचाराचे प्रमुख मिर्भिड दैनिक
महासत्ता एकच आवृत्ती 14 OCT 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मोडी लिपीचे संवर्धन होणे गरजेचे

## मोडी तज्ज्ञ वसंत सिंघन

**कोल्हापूर, ता.१३ (प्रतिनिधी)-**

लोप पावत चाललेली मोडी लिपीसह अन्य लिप्यांचे जतन व संवर्धन काळाची गरज असून शिवाजी विद्यापीठाने प्रमाणपत्र अभ्यासक्रमा बरोबर पदव्युत्तर व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम राबविणे गरजेचे असल्याचे मत मोडी तज्ज्ञ वसंत सिंघन यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व इतिहास अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी व लोप पावत असलेल्या लिप्यांचे संवर्धन जाणीव जागृती या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. त्यावेळी प्रमुख पाहुणे मोडी तज्ज्ञ वसंत सिंघन बोलत होते.

मोडी तज्ज्ञ वसंत सिंघन यांनी आपल्या व्याख्यानात मोडी संदर्भात ज्या लिप्यांचा सहभाग आहे.

विद्यापीठातील इतिहास अधिविभागाचे प्रमुख डॉ. अविनाश पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात मोडी व इतर लोप पावत चाललेल्या लिप्यांच्या संदर्भात लिप्या वाचणारे, जाणणारे व देवनागरीत लिप्यांचे भाषांतर करणाऱ्या तज्ज्ञ व्यक्ती निर्माण करणे काळाची गरज असल्याचे सांगितले. स्वागत डॉ. सुमन बुवा यांनी केले. पाहुण्यांचा परिचय यशोधन बोकील यांनी केले, आभार प्रदर्शन रवींद्र खैरे यांनी केले व सूत्रसंचालन अरविंद पालके यांनी केले. डॉ. ए. एम. गुरव, प्रभारी संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग यांचे कार्यक्रमाला मार्गदर्शन लाभले.

महासत्ता एकच आवृत्ती 14 OCT 2021

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हवामान बदलांमुळेच पर्जन्यमानात वाढ-डॉ.पन्हाळकर

कोल्हापूर, ता. ८(प्रतिनिधी)-

..................................

हवामान बदलाचा परिणाम म्हणून पंचगंगा खोऱ्यात साळवण व इचलकरंजी या ठिकाणी सन २०१९मध्ये क्षमतेपेक्षा जास्त (अनुक्रमे १०४० मिमी, ८४ सेमी) पावसाची नोंद झाल्यामुळे पूरस्थिती निर्माण झाली. त्यामुळे पर्जन्याचे स्वरूप, त्याची तीव्रता, कालावधी, प्रवणक्षेत्र यांचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेंट चेंज व सस्टेनॅबिलिटी स्टडिज'चे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी केले. केंद्रामार्फत 'हवामान बदल व शाश्वत विकास' या ऑनलाईन व्याख्यानमालेतील सहावे पुष्प गुंफताना 'पंचगंगा महापूर: कारणे व उपाय' या विषयावर ते बोलत होते. पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ.पी.डी.राऊत अध्यक्षस्थानी होते.

डॉ. पन्हाळकर म्हणाले, अचूक पर्जन्य माहितीच्या आधारे रन ऑफ मॉडेल, फ्लड मॉडेल अशा नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून महापुराची तीव्रता कमी केली जाऊ शकते. पंचगंगा खोऱ्यात आलेल्या सन २००५ व २०१९ च्या पुरांचे तुलनात्मक विश्लेषण केले असता २०१९च्या पुराची तीव्रता अधिक असल्याचे अभ्यासाअंती स्पष्ट झाले. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने हा संभाव्य धोका ओळखला जाऊ शकतो. बदलणाऱ्या भूमी उपयोजनांमुळे जंगल क्षेत्र कमी होऊन शेतीचे क्षेत्र वाढत आहे. त्यामुळे पाणी वाहून जाण्याचे प्रमाण वाढून पूर येतो. पंचगंगा खोऱ्यातील केवळ १२ टक्के क्षेत्र धरण पाणलोटाचे असून इतर भागातून येणाऱ्या पाण्यावर आपण नियंत्रण करू शकत नाही. त्यामुळे पूर स्थिती येते. ही समस्या दूर करण्यासाठी कॅसकेड धरणांची शृंखला निर्माण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमास देशभरातून विविध विद्यापीठातील अभ्यासक, महाविद्यालयीन शिक्षक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

# स्वतंत्र पूर आपत्ती व्यवस्थापन विभाग निर्माण करणे आवश्यक

## नंदकुमार वडनेरे

कोल्हापूर, ता. २६ (प्रतिनिधी)-

..............................

राज्यात स्वतंत्र पूर आपत्ती व्यवस्थापन विभाग निर्माण करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राच्या जलसंपदा विभागाचे माजी प्रधान सचिव नंदकुमार वडनेरे यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर क्लायमेट चेंज अँड सस्टेनेबिलीटी स्टडीज' यांच्यातर्फे आयोजित करण्यात आलेल्या ऑनलाईन व्याख्यानमालेत दुसरे पुष्प गुंफताना 'धरणे, महापूर आणि हवामान बदल' या विषयावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील होते.

डॉ. वडनेरे म्हणाले, पूर हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. तो थांबविता येणार नसला तरी त्याची तीव्रता कमी करणे निश्चितपणे शक्य आहे.

प्र-कुलगुरू डॉ.पी.एस.पाटील म्हणाले, सद्यस्थितीत बदलते हवामान आणि मानवी अतिक्रमणे ही कारणे महापुराला कारणीभूत आहेत. केवळ धरणांना त्यासाठी जबाबदार धरणे चुकीचे आहे. तथापि, मानवाने आपल्या वर्तनामध्ये सुधारणा करणे हे अधिक आवश्यक आहे. केंद्राचे समन्वयक डॉ. सचिन पन्हाळकर यांनी कार्यक्रमाचे स्वागत, प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन केले.

14 OCT 2021 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोटीच्या निधीने झाले अनेकांचे कल्याण

## शिवाजी विद्यापीठाचा सकारात्मक उपक्रम



गुरुबाळ माळी, कोल्हापूर

वर्षभरात करोना संसर्गाने अनेकांच्या संसाराची राखरांगोळी केली. अनेक मुलांसह काही पालकांना या करोनाने हिरावून घेतले. यातून मुले अनाथ झाली, पालकांचा आधारही तुटला. आर्थिक संकटांची तर रांगच लागली. अशा कठीण परिस्थितीत करोनासह विविध कारणांनी या काळात अडचणीत सापडलेल्या मुलांसह त्यांच्या पालकांच्या मदतीला शिवाजी विद्यापीठ धावून आले. सहा महिन्यात तब्बल एक कोटी रुपये देऊन मदतीचा हात दिला. यातून अनेकांचे जीवन जगणे किमान काही प्रमाणात सुसह्य झाले. विद्यापीठाच्या कल्याण निधीतून अनेकांच्या आयुष्याचेच कल्याण झाले.

दीड वर्षापासून करोना संसर्गाने थैमान घातले आहे. दक्षिण महाराष्ट्रात हा विळखा अधिक घट्ट झाला होता. या परिसरातील सहा लाखांवर लोकांना करोनाचा फटका बसला. पंधरा हजार जणांचा बळी गेला. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील दहा हजारांवर लोकांचा यामध्ये समावेश आहे. मृतांमध्ये अनेक महाविद्यालयीन तरुणांबरोबरच त्यांच्या पालकांचाही समावेश आहे. अचानक झालेल्या मृत्यूमुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडले. हातातोंडाला आलेला मुलगा गेल्याने पालकांचा आधारच तुटला. औषधोपचाराच्या खर्चाने तर सारे गणितच बिघडले. अशा वेळी शिवाजी विद्यापीठ या अडचणीत आलेल्या कुटुंबाच्या मदतीला धावून आले.

शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अथवा त्यांच्या पालकाचे अकस्मात निधन झाल्यास त्यांच्या कुटुंबाला दीड लाखापर्यंत मदत केली जाते. मुलाचे निधन झाल्यास दीड लाख रुपये, तर पालकाचे निधन झाल्यास ७५ हजार रुपयांची मदत केली जाते. यासाठी दर वर्षी विद्यार्थ्यांकडून पन्नास रुपये, प्राध्यापकांकडून दोनशे, तर कर्मचाऱ्यांकडून शंभर रुपये याप्रमाणे हा निधी जमा केला जातो. जमा झालेला हा निधी अडचणीत आलेल्या पालक आणि विद्यार्थ्यांबरोबरच प्राध्यापक व कर्मचाऱ्यांसाठी खर्च केला जातो. सहा वर्षांत 'विद्यार्थी, पालक, शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी कल्याण निधी' या योजनेत तब्बल साडेचार कोटींचा निधी जमा झाला आहे.

### तीनशेहून अधिक जणांना लाभ

सहा वर्षांत या योजनेचा ३३३ पालक आणि मुलांना लाभ झाला. त्यामध्ये यावर्षी ११३ पालक आणि मुलांना या योजनेतून मदतीचा हात देण्यात आला. त्यासाठी एक कोटी पाच लाख रुपये या कुटुंबाला देण्यात आले. सहा महिन्यांत करोनामुळे शंभरावर पालक आणि विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. या सर्वांना शिवाजी विद्यापीठाने आर्थिक आधार दिला.

**" करोना संसर्गाने दक्षिण महाराष्ट्रातील अनेक विद्यार्थी आणि पालकांचा करोनाने बळी घेतला. यामुळे अनेक कुटुंबासमोर जगण्यासाठी आर्थिक प्रश्न उभा राहिला. अशा वेळी विद्यापीठाने सहा महिन्यांत कोटी रुपयांचा निधी देऊन 'लाख' मोलाचा हात दिला.**

– आर. व्ही. गुरव, संचालक, विद्यार्थी विकास मंडळ

### असा झाला लाभ

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थी | १२७ | निधीचे वितरण | एक कोटी ३५ लाख रुपये |
| पालक | १७८ | निधीचे वितरण | ७१ लाख रुपये |
| प्राध्यापक, कर्मचारी | २७ | निधीचे वितरण | ५२ लाख रुपये |
| एकूण निधी जमा | चार कोटी ४६ लाख रुपये | | |
| एकूण निधीचे वितरण | दोन कोटी ६० लाख रुपये | | |
| करोनाकाळात मदत | एक कोटी ५ लाख रुपये | | |

14 OCT 2021 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यातील महाविद्यालये २० पासून सुरु

प्रतिनिधी
मुंबई

राज्यातील सर्व अकृषक विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत



असल्याची घोषणा बुधवारी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केली. ज्यांनी कोरोना लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत, ते विद्यार्थी प्रत्यक्ष उपस्थित राहू शकतील. तर ज्यांनी लस घेतलेली नाही अशांसाठी विद्यापीठ, संस्था प्रमुखाने स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे असे आदेश देण्यात आले. दरम्यान मुंबईत लोकल ट्रेन प्रवासाची परवानगी मिळणे आवश्यक असल्याने याबाबतचा प्रस्ताव मुख्य सचिवांकडे पाठविण्यात येईल असे सांगितले.

महाविद्यालये पूर्णपणे की ५० टक्के क्षमतेने सुरु करावीत यावर स्थानिक प्राधिकरणांशी चर्चा करुन निर्णय घेण्याच्या सूचना केल्या आहेत.